महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : ४९ वे दिनांक : ०९/०२/२०२६ वार : सोमवार

## मोदींच्या जिवाला धोका असेल तर राजीनामा द्या; इम्रान मसूदांचे संसदेत आव्हान




**वाराणसी :** काशीमध्ये काँग्रेसने संविधान संवाद रॅलीचे आयोजन केले होते. यादरम्यान खासदार इम्रान मसूद यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत प्रश्न उपस्थित केला. मसूद म्हणाले की, ज्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या जिवाला संसदेत धोका आहे. त्यांनी राजीनामा द्यावा. जर त्यांचाच जीव सुरक्षित नसेल तर मग देश कसा सुरक्षित राहील?, असा प्रश्न या रॅलीदरम्यान खासदार इम्रान मसूद यांनी उपस्थित केला.

'गेल्या अनेक महिन्यांपासून नरेंद्र मोदींवर जे संकटाचे ढग दाटले आहेत, ते काशीची देणगी आहेत. मणिकर्णिकेची देणगी आहेत. ते त्या मृतदेहांची देणगी आहेत, जे गंगा मातेच्या कुशीत वाहत होते. गंगा मातेचे अश्रू वाहत होते, पण मोदीजींना ते दिसत नव्हते. हा शाप इथूनच जात आहे. ज्याने काशीला धोका दिला, तो मला आणि तुम्हाला काय सोडणार? जो गंगा मातेच्या नावाने इथे आला, त्याने गंगा मातेलाच धोका दिला. तो मला आणि तुम्हाला काय मानणार?'

हे विधान काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते पवन खेरा यांनी काशीमध्ये केले. खरं तर, रविवारी काँग्रेसची संविधान संवाद रॅली झाली. यामध्ये देशभरातून काँग्रेसचे मोठे नेते आणि कार्यकर्ते पोहोचले होते. रॅलीदरम्यान काँग्रेसच्या निशाण्यावर पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री योगी हेच होते.

यावेळी राष्ट्रीय प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत म्हणाल्या- पंतप्रधान आणि मुख्यमंत्री जेव्हा इथे मूर्ती तोडतात, तेव्हा रक्त सळसळते. काशी एक जिवंत सभ्यता आहे. मला त्यावेळी सुखद अनुभव आला होता, जेव्हा २०२४ च्या निवडणुकीचे निकाल समोर येत होते. प्रत्येक फेरीत नरेंद्र मोदी हरत होते. यासाठी मी काशीच्या जनतेचे आभार मानते.

रॅलीमध्ये खासदार किशोरी लाल, यूपी काँग्रेस अध्यक्ष अजय राय यांच्यासह पक्षाचे २० हून अधिक ज्येष्ठ नेते उपस्थित होते. व्यासपीठावर नेत्यांनी एकमेकांचा हात धरून एकजुटीचा संदेश दिला. तर, कार्यकर्त्यांनी राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, प्रियंका गांधी, सोनिया गांधी आणि काँग्रेस पक्ष जिंदाबादच्या घोषणा दिल्या.

## जातीनिहाय जनगणना व UGC धोरणांविरोधात १७ फेब्रुवारीला नागपुरात ओबीसींचे भव्य आंदोलन

**नागपूर :** नागपुरात सकल ओबीसी महामोर्चाच्या वतीने आयोजित बैठकीत ओबीसींच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर मंथन करण्यात आले असून, या बैठकीत १७ फेब्रुवारी रोजी नागपुरात भव्य आंदोलन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार आणि यूजीसीचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पार पडली.

या बैठकीत विदर्भातील प्रमुख ओबीसी संघटनांनी जातीनिहाय जनगणनेतील तांत्रिक त्रुटींवर तीव्र असंतोष व्यक्त केला. प्रामुख्याने घरसूची प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ मध्ये ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नसल्याने समाजाच्या घटनात्मक हक्कांवर भविष्यात गदा येण्याची शक्यता बैठकीत वर्तवण्यात आली. यासोबतच यूजीसीच्या नव्या धोरणांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली असून, या सर्व तांत्रिक आणि धोरणात्मक त्रुटींच्या निषेधार्थ १७ फेब्रुवारीला आंदोलनाचा एल्गार पुकारला जाणार आहे.

या बैठकीनंतर विजय वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, जनगणनेच्या संदर्भात तसेच यूजीसीच्या संदर्भात आमच्यात चर्चा झाली. ओबीसीची जनगणना होणार नसेल तर हे अन्यायकारक आहे. सरकारकच्या दरवाजात या सगळ्याच्या विरोधात १७ तारखेला आम्ही संविधान चौकातून धरणे आंदोलन सुरू करणार आहोत. या जनगणनेमध्ये जोपर्यंत ओबीसीचा समावेश होत नाही, तोपर्यंत मोठे आंदोलन या देशात उभारले जाणार आहे. या पलीकडे जाऊन ओबीसी संमेलन देखील आम्ही आयोजित करणार आहोत.

## अजितदादांच्या आवडत्या वस्तू पाहण्याची संधी; बारामतीत संग्रहालय व ब्राँझ पुतळा उभारणार



**पुणे :** दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळावर लेअरजेट हे विमान लँडिंग होताना रनवेच्या बाजूला अचानक कोसळून दुर्दैवी अपघाती निधन झाले. विद्या प्रतिष्ठानच्या ज्या मैदानावर अजितदादा यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात अजित पवार यांचे महत्त्वपूर्ण वस्तूंचे संग्रहालय उभारण्यात येणार आहे. या संग्रहालयात अजितदादा यांना आवडणारी मागील ३० वर्षातील संग्रह केलेली घड्याळे, गॉगल, कपडे, चपला ठेवण्यात येणार आहे. त्याचसोबत संबंधित संग्रहालयात अजितदादांचा कायमस्वरूपी ब्राँझ पुतळादेखील उभारला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

अजितदादा यांचा विमान अपघात झाल्यानंतर दादांच्या सोबत असणाऱ्या वस्तू त्यांचे घड्याळ, चष्मा, चष्म्याची केस, चप्पल, बुटाचा जोड, जळालेले कपडे हे देखील कुटुंबीयांना प्राप्त झाले आहेत. या वस्तूदेखील या संग्रहालयात ठेवण्यात येणार आहेत. अजित पवार यांच्या आतापर्यंतच्या कारकीर्दीची माहितीदेखील या ठिकाणी प्रसारित करण्यात येईल. त्याचसोबत त्यांच्या जीवनावर आधारित एक चित्रफीत देखील संग्रहालयासाठी निर्मित केली जाणार आहे.

अजितदादा यांना गाण्यांची आवड होती. कोणत्याही प्रवासात ते गाणी आवर्जून ऐकत असत. त्यामुळे त्यांच्या आवडीच्या जुन्या कॅसेट, रेकॉर्डिंग या ठिकाणी ठेवले जाईल. त्याचसोबत आतापर्यंत मिळालेले महत्त्वपूर्ण पुरस्कार, स्मृतिचिन्हे देखील प्रदर्शित केले जाणार आहे. अजित पवार यांचे स्मारक बनवण्यासाठी डिझाइन तसेच लेआऊट तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात उभारणाऱ्या स्मारकापूर्वी प्रतिष्ठानची औपचारिक परवानगी घेतली जाणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख खासदार शरद पवार यांच्या आतापर्यंतच्या राजकीय कारकिर्दीवर आधारित एक संग्रहालय यापूर्वीच बारामतीमधील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात १० वर्षांपूर्वी उभारण्यात आले आहे. शरद पवार यांची राजकारणातील सुरुवात, त्यांची पहिली निवडणूक, प्रचाराचे स्वरूप, मंत्रिपदावरील कामकाज, मुख्यमंत्री, कृषिमंत्री कारकीर्द, त्याचसोबत विविध मिळालेल्या भेटवस्तू येथे संग्रहित करण्यात आलेल्या आहेत. आता अजितदादा यांच्या वस्तूंचेदेखील असेच एक संग्रहालय या जागी निर्माण होणार असून दादांच्या आठवणी यानिमित्ताने पाहावयास मिळणार आहेत. यानिमित्ताने अजित पवार यांच्या चाहत्यांना त्यांनी वापरलेल्या वस्तू पाहता येणार आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ फेब्रुवारी २०२६


## पुणे झेडपी निवडणूक : बोगस मतदान प्रकरणी ६ जणांवर गुन्हा




**पुण** : पुणे जिल्हा परिषद निवडणुकीत बोगस मतदान केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नगर रस्त्यावरील केसनंद भागातील एका मतदान केंद्रावर ही घटना घडली असून, त्यांच्याकडून बनावट आधारकार्ड जप्त करण्यात आले आहेत.

या प्रकरणी मोहम्मद एहसान नजर (वय २०), अर्षद रोशन अली (वय २२), अखिलेश बिजूकुमार प्रसाद (वय २०), दिलीप सक्रु चव्हाण (वय ३६), प्रेमदास रामचंद्र राठोड (वय ३०) आणि अश्विनी प्रेमदास राठोड (वय २७) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस हवालदार बाळासाहेब हराळ यांनी वाघोली पोलीस ठाण्यात याबाबत फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषदेचे मतदान शनिवारी (७ फेब्रुवारी) पार पडले. केसनंद भागातील श्री जोगेश्वरी विद्यालयाच्या आवारातील मतदान केंद्रात तीन आरोपींनी मतदान केले. त्यानंतर, मतदान केंद्रातील कर्मचाऱ्यांनी इतर तीन जणांची चौकशी केली असता, त्यांच्याकडे बनावट आधारकार्ड आढळून आले. पोलिसांनी तात्काळ सहाही जणांना ताब्यात घेतले.

गुन्हा दाखल करण्यात आलेले आरोपी बांधकाम मजूर असून, ते सध्या केसनंद भागातील एका नियोजित गृहप्रकल्पाच्या आवारात राहतात. यातील तीन आरोपी मूळचे उत्तर प्रदेशातील आहेत, तर उर्वरित तीन वाशीम जिल्ह्यातील आहेत. गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

पूर्ववैमनस्यातून एकावर कोयत्याने वार करुन पसार झालेल्या सराइताला सहकारनगर पोलिसांनी अटक केली. खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर गेले तीन महिने तो पोलिसांना गुंगारा देत होता.

विशाल बाळासाहेब कांबळे (वय २७, रा. धनकवडी) असे अटक करण्यात आलेल्या सरइताचे नाव आहे. धनकवडीत २५ ऑक्टोबर रोजी वैमनस्यातून एका तरुणावर कांबळेने कोयत्याने वार केले होते. या घटनेत तरुण जखमी झाला होता. या प्रकरणी कांबळे याच्याविरुद्ध सहकारनगर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर तो पसार झाला होता. तो लोहगाव परिसरात येणार असल्याची माहिती पोलीस हवालदार अमोल पवार आणिअभिमान बागलाने यांना मिळाली. पोलिसंच्या पथकाने सापळा लावून त्याला ताब्यात घेतले.

## सिल्लोडमध्ये मयत मतदारांच्या नावाने बोगस मतदानाचा प्रयत्न; दोघे रंगेहात पकडले

**सिल्लोड** : जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शनिवारी मतदान सुरू असताना सिल्लोड तालुक्यातील डोंगरगाव सर्कलमध्ये लोकशाहीला काळिमा फासणारा प्रकार समोर आला आहे. मयत मतदारांच्या नावावर बोगस मतदान करण्याच्या उद्देशाने आलेल्या दोन संशयित व्यक्तींना रंगेहात पकडण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे हा गैरप्रकार उघडकीस आला असून, या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

डोंगरगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये शनिवारी दुपारच्या सुमारास मतदान प्रक्रिया सुरू होती. यावेळी दोन व्यक्ती मतदान केंद्रावर आल्या आणि त्यांनी मयत असलेल्या मतदारांच्या नावाने मतदानाची चिठ्ठी सादर केली. केंद्रावर उपस्थित असलेल्या भाजपाचे डोंगरगाव मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लु यांना या व्यक्तींच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. त्यांनी तत्काळ या प्रकाराला आक्षेप घेत त्या व्यक्तींना जाब विचारला असता त्यांचे बिंग फुटले. मोरेल्लु यांनी प्रसंगावधान राखत या दोन्ही बोगस मतदारांना पकडले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले.

राज्यात भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेची महायुती असली, तरी सिल्लोड तालुक्यात शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांच्यात विळ्या-भोपळ्याचे सख्य आहे. याआधी नगरपालिका निवडणूक, आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक दोन्ही पक्ष एकमेकांविरोधात लढत आहेत. दोन्ही बाजूंनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्याने मतदानाच्या दिवशी मोठा राडा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. त्यातच आता बोगस मतदानाचा प्रकार समोर आल्याने सत्तार गटावर विरोधकांकडून टीकेची झोड उठवण्यात येत आहे.

मात्र, लोकशाहीच्या या पवित्र उत्सवात मयत मतदारांच्या नावे मतदान करण्याचे धाडस करणाऱ्यांच्या मागे सूत्रधार कोण? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. या संशयितांवर पोलीस कठोर फौजदारी गुन्हा दाखल करतात की नाही आणि निवडणूक आयोग या केंद्राबाबत काय निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## ऋतू वसंत फुलला

आला वसंत नाचत
नवी पालवी फुटली
येता झाडांना बहार
झाडे फुलांनी नटली. १

ऋतु वसंत फुलला
वनराई बहरली
येता आंब्याला मोहर
चिंच चिंचानी भरली. २

ऋतु वसंत पाहून
रानी पळस फुलला
फुल पळसा पाहून
नाग तोऱ्यात डुलला. ३

झाले रान सुगंधित
गाणं कोकिळा गाईला
गाणं ऐकून मंजुळ
होई आनंद माईला. ४

पहा इकडे तिकडे
सारा निसर्ग सजतो
कवी आनंदी होऊन
छान कविता रचतो. ५

ऋतु वसंतात बघा
कवी निसर्ग वाचतो
सारा निसर्ग फुलतो
शब्द काव्यात नाचतो. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## याच वेशीवर

याच वेशीवर बसत होते
एकाच वेळी बगळे, कावळे
अन् आम्ही शाळेतील लेकरं..

याच वेशीतून आल्या बैलगाडीत बसून
नवऱ्या..
हळदीच्या अंगाने
नवं स्वप्न उरात घेऊन नव्या जगात
अन् इथुनच गेल्या
आयुष्यभराची होरपळ सोसून
चौघांच्या खांद्यावर
शेवटचा क्षणभराचा विसावा घेऊन
अनंताच्या प्रवासाला..

याच वेशीतून
आले पोस्टमन काका
सायकलवर पत्र अन् निरोप घेऊन
लेकी - बाळींच्या सुख दुःखाचा..
याच वेशीतून
गेला लोंढा पहिल्या पावसाचा
गावाच्या बाहेर नदीला भेटण्यासाठी..

याच वेशीतून आले दरवेशी,गोसावी, भिकारी
अन् बरेच पोटभरू
गावाने दिली त्या प्रत्येकांना पोटभर भाकर
माणुसकी धर्माला स्मरून..

याच वेशीने
पाहिली सकाळी भरलेली शाळा
शाळेतील लेकरांचा गोतावळा
अन् ऐकली कान देवून,मन लावून
शाळेतील प्रार्थना, प्रतिज्ञा, कविता
अन् उजळणीचा गावभर गेलेला स्वर
छडीच्या छमछम आवाजासोबत..

इथूनच पडले लेकरं बाहेर
शिक्षण, नोकरी अन् पोटपाण्यासाठी
तेव्हा माय बापासोबत वेशही रडत होती..

याच वेशीने ऐकली पहाटची काकड आरती
अन् विधीची पवित्र धून
तर दिवेलागणीच्या वेळी शहाडा..
अन् हरिपाठासोबत रात्री देवळात चालणाऱ्या
रामायण महाभारत अन् हरिविजयाची कथा..

याच वेशीतून लग्नाच्या मिरवणुकीत
झाला ढोल ताशांचा गजर
पोळ्याच्या दिवशी मानाच्या बैलावरून भांडण..

याच वेशीवर उधळला
निवडणुकीत गुलाल विजेत्या लेकरांनी
अन् वेशीने पाहिलं रडताना हरलेल्या मनाला
अन् तिनंच दिला विश्वास जग जिंकण्याच्या
समोर उभ्या असलेल्या पांडुरंगाच्या साक्षीने..
याच वेशीने पाहिलं
गाव नांदताना..भांडताना..
गाव रडताना.. खेळताना..

अन् पहाटे ऐकली
जात्यावरची गाणी..
अन् आयाबायाच्या डोक्यावरचं
पाहिलं सांडणारं हंडाभर पाणी..

या वेशीतून भरली
आषाढात लक्ष्मी आईची यात्रा
उन्हाळ्यात बारा गाड्यांची जत्रा

इथंच साजरा झाला
गावाचा दिवाळी दसरा
अन् ज्ञानेश्वरी सप्ताह..

या वेशीने ऐकलं कीर्तन
पाहिला तमाशा,रामलीला अन् नाटकासोबत..

अन् बदलताना गाव पाहिला कोरोना..
आपल्याच लेकरांना वेश बंद होताना
तेव्हा रडत होती वेस आतल्या आत...

आता गाव मोठं झालं
विटा सिमेंट अन् दगडाने
अन् वेस होत गेली लहान
तिची एकेक विट हरवल्याने..

आता केली तिने तक्रार
गावाचं राखण करणाऱ्या मारोतीरायाकडे..

तिच्या ढासळल्याची,तिच्या विटा हरवल्याची
अन् गाव बदलल्याची

पण आता मारुतीही बोलत नाही
म्हणून ती उदासली आहे..

**- ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ फेब्रुवारी २०२६

## पर्यावरणाला वाचवू

नदी झाली कोरडी
विहीर गेली आटून
पर्यावरणाची झाली हानी
पाणी येणार कुठून?

रस्त्याच्या कडेला
दिसेना आता झाडी
स्वार्थी माणसाने केली
प्रचंड वृक्षतोडी

थेंब थेंब पाण्यासाठी
व्याकूळ झाले रान
कशी आता भागणार
वृक्षवल्लीची तहान?

प्रत्येकाने लावू आता
एक एक झाड
थोडं थोडं पाणी टाकून
करू त्यांची वाढ

रूसलेल्या ढगातून
पाऊस पडेल खूप
तृप्त होऊन धरती
घेईल हिरवं रूप

आपण सर्व मिळून
पर्यावरणाला वाचवू
वृक्षसंवर्धनाचा संदेश
घराघरात पोहचवू



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो. ९०११५५९१०६

## कसा उपटला खुटा

देई जीवाला आचक्या
तान्हं मांडीवर मराव.
रानं यमाच्या तावडी
डोळ्या दाटले आसवं....

घास लेकरा भरला
रानं हरण्या पिकाचं
यम होऊन धाडला
ढग डखाळ वानाचं....

रानं उदासल्या वाटा.
काय धोसरा धरला.
कुण्या जन्माचं इखनं
आलं मुक्या दावणीला...

कसा उपटला खुटा
भूई दमकोंडी झाली.
रानं रानोटी चिभड
पिकं मरणाची बोली...

उभ्या मुर्दाड रानात
खेळ मांडला ढगाडी
भर दिवाळीच्या दिसी
घाली मातीत फुगडी...

वावराच्या पोटामंधी
कशी तराळी तुंबली.
झालं सपान वंगाळ
काढी कुणबी खपली...



डॉ प्रभाकर शेळके,
जालना

# बोरीच्या नेमिनाथ जैन यांना राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्कार प्रदान



**जिंतूर (बी.डी. रामपूरकर) :** स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालय पूर्णा जं.आणि परभणी जिल्हा ग्रंथालय संघ परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने ४८ वे परभणी जिल्हा ग्रंथालय संघाचे वार्षिक अधिवेशनात बोरी येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांना ग्रंथालय क्षेत्रातील सर्मर्पित योगदानाबद्दल स्वातंत्र्य सैनिक सूर्यभानजी पवार यांच्या स्मरणार्थ राज्यस्तरीय ग्रंथमित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिकुलपती डॉ. अशोक महाजन, छत्रपती संभाजी नगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, कार्यक्रमाचे संयोजक तथा प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार, गुलाबराव कदम डॉ. धर्मराज वीर, सुनील वायाळ, एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबईचे डॉ. सुभाष चव्हाण, सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुण्याचे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे निवृत्त विभाग प्रमुख डॉ . राजेंद्र कुंभार, व. ग. सूर्यवंशी , मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, राजेंद्र हंबीरे, डॉ, राजेंद्र सानप, ज्ञानेश्वर पाटील ,डॉ. मधुकर गरड, मराठवाडा विभागीय ग्रंथालय संघाचे कार्यवाहक राम मेकले, प्रा. चंद्रकांत जोशी सनपूरकर, प्रा. विलास वैद्य आदींची यावेळी उपस्थिती होती. प्रतिकुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.ग्रंथालय क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल नेमिनाथ जैन यांना राज्यस्तरीय ग्रंथ मित्र पुरस्कार दिला असल्याचे संयोजक प्राध्यापक डॉ. रामेश्वर पवार यांनी यावेळी सांगितले.कार्यक्रमास जिल्ह्यातील ग्रंथालयाचे पदाधिकारी ग्रंथपाल व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल नेमिनाथ जैन यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# तोपखाना केंद्रीय विद्यालयात "परीक्षा पे चर्चा" चे थेट प्रक्षेपण; विद्यार्थ्यांनी तणावमुक्तीचे मंत्र जाणून घेतले




**नाशिक (वार्ताहर) :** तोपखाना केंद्रात असलेल्या पीएमश्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्पने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय कार्यक्रम "परीक्षा पे चर्चा 2026" चे थेट प्रक्षेपण मोठ्या उत्साहाने पाहिले. शाळेच्या संगणक सभागृहात मोठ्या स्क्रीनवरून विद्यार्थी आणि शिक्षकांनी पंतप्रधानांचे थेट भाषण ऐकले.परीक्षा म्हणजे एक उत्सव : पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले की परीक्षा ही ओझे नसून एक उत्सव आहे. इतरांशी नाही तर स्वतःशी स्पर्धा करण्याचा सल्ला त्यांनी दिला.तणाव व्यवस्थापन: कार्यक्रमादरम्यान वेळेचे व्यवस्थापन आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी व्यावहारिक टिप्स देण्यात आल्या. प्रत्यक्ष संवाद: देशभरातील निवडक विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांना थेट प्रश्न विचारले, ज्यांची उत्तरे त्यांनी अतिशय सोप्या आणि प्रेरणादायी पद्धतीने दिली. शाळेचे प्राचार्य गजराज मीना यांनी स्पष्ट केले की, आगामी बोर्ड परीक्षांपूर्वी भीती कमी करणे आणि सकारात्मक मानसिकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

विद्यार्थ्यांनी या सत्राचे वर्णन खूप प्रेरणादायी असल्याचे सांगितले आणि पंतप्रधानांच्या शब्दांनी त्यांचे मनोबल वाढले असल्याचे सांगितले.

प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०९ फेब्रुवारी २०२६


## अजित पवारांच्या विमानात सुसाईड बॉम्बरचा संशय; राष्ट्रवादी आमदाराचा धक्कादायक दावा





**अकोला :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना ठार मारण्यासाठी त्यांच्या विमानात सुसाईड बॉम्बर अर्थात आत्मघातकी हल्लेखोराचा वापर करण्यात आल्याचा संशय सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी रविवारी व्यक्त केला आहे. अमोल मिटकरी सातत्याने अजित पवारांच्या मृत्यूवर संशय घेत आहेत. पण यावेळी त्यांनी थेट आत्मघातकी हल्लेखोराचा उल्लेख केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

अजित पवार यांचा गत २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळावर झालेल्या एका विमान अपघातात मृत्यू झाला होता. तेव्हापासून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेससह विविध पक्षांच्या नेत्यांनी त्यांच्या मृत्यूवर संशय व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अमोल मिटकरी यांनी रविवारी पत्रकारांशी संवाद साधताना पुन्हा एकदा अजित पवारांच्या निधनावर शंका घेतली आहे. ते म्हणाले, अजित पवार ज्या विमानाने प्रवास करत होते, त्या व्हीएसआर कंपनीचे पायलट दोनवेळा बदलण्यात आले होते. ते विमान अगोदरच नादुरुस्त होते. त्याच्यावर एक वर्षापासून बंदी होती. त्यानंतरही अजित पवारांना तेच विमान २८ तारखेला देण्यात आले.

व्हीएसआर कंपनीने गत डिसेंबर महिन्यात आपल्या कंपनीच्या प्रत्येक वैमानिकाचा प्रत्येकी ५० कोटी रुपयांचा विमा उतरवला होता. जर ५० कोटींचा विमा उतरवला गेला असेल आणि जो पायलट ऐनवेळी बदलण्यात आला अन् त्याला हिप्नोटाईज केले होते का? त्याला आमिष दाखवण्यात आले होते का? अनेक ठिकाणी हिप्नोटाईज करून सुसाईड बॉम्बरचा वापर केला जातो, असे मिटकरी म्हणाले.

अमोल मिटकरी यांनी आपल्या दाव्याखातर राजीव गांधी यांची हत्या व मुंबईवरील हल्ल्याचाही दाखला दिला. ते म्हणाले, अजमल कसाब यालाही दहशतवादी हल्ल्यासाठी पाठवण्यात आले होते. राजीव गांधी यांची हत्या झाली त्यावेळीही असा प्रयत्न झाला होता. त्यामुळे अजित पवारांच्या विमानाच्या पायलटला हिप्नोटाईज करून पाठवले होते का? हा मोठा प्रश्न आहे. कारण, पायलटने 'मे डे'चा कॉल दिला नाही. टेक ऑफ घेतल्यानंतर काही वेळातच पुणे कव्हर करता आले असते, पण पायलटने ते केले नाही. त्यामुळे आम्हाला मोठी शंका व्हीएसआर कंपनीवर आहे.

५० कोटींचा विमा काढून त्यांनी पायलटला हे कृत्य करण्यास लावले का? याचाही तपास झाला पाहिजे. या प्रकरणी मी मंगळवारी दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहे, असे मिटकरी म्हणाले.

अमोल मिटकरी यांनी यावेळी रोहित पवार यांच्या १० तारखेच्या पत्रकार परिषदेवरही भाष्य केले. आमदार रोहित पवार अजित पवारांच्या अपघाती मृत्यू प्रकरणी कुटुंबातील एक सदस्य म्हणून पत्रकार परिषद घेणार आहेत. त्यांच्या पत्र परिषदेकडे महाराष्ट्रासह अवघ्या देशाचे लक्ष लागले आहे. मला अपेक्षा आहे ते अनेक गोष्टी कव्हर करतील. जे काही पुरावे त्यांच्याकडे असतील, ते सादर करतील. त्यामुळेच त्यांची पत्रकार परिषद पाहणे अतिशय महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले.

## IIT जोधपूर वाद : 'नीच' हा जातीय शब्द नाही; राजस्थान HC कडून SC-ST कारवाई रद्द



**जोधपूर** :राजस्थान उच्च न्यायालयाने आयआयटी जोधपूरचे संचालक आणि सहयोगी प्राध्यापक यांच्यातील वादग्रस्त प्रकरणात म्हटले की, 'नीच' हा शब्द वापरणे केवळ जातीच्या आधारावर अपमान मानला जाऊ शकत नाही. न्यायमूर्ती संदीप शाह यांच्या एकलपीठाने डॉ. दीपक अरोरा यांच्या याचिकेवर सुनावणी करताना एससी-एसटी कायद्यांतर्गतची फौजदारी कारवाई रद्द केली.

न्यायालयाने शनिवारी आदेश पारित केला. तथापि, न्यायालयाने स्पष्ट केले की सहयोगी प्राध्यापकांविरुद्धची पोलिस चौकशी सुरू राहील. न्यायालयाने 'स्वर्ण सिंग विरुद्ध राज्य' प्रकरणाचा संदर्भ देत म्हटले की, एससी/एसटी कायद्यांतर्गतचा अपमान सार्वजनिक ठिकाणी असावा. ही घटना संचालकांच्या बंद दालनात घडली होती, जिथे जनतेला प्रवेश नव्हता. त्यामुळे याला 'सार्वजनिक दृश्य' मानले जाऊ शकत नाही.

कोर्टाने स्पष्ट केले की, 'नीच' शब्दाचा अर्थ नीच किंवा अधम असा होतो, ज्याचा उपयोग एखाद्याच्या वाईट नैतिक चारित्र्याचे वर्णन करण्यासाठी केला जातो. हे कोणत्याही विशिष्ट समुदाय किंवा जातीचे नाव नाही. कोर्टाने पूर्वीच्या निर्णयांचा (अचल सिंह विरुद्ध राजस्थान राज्य) हवाला देत म्हटले की 'नीच' म्हणणे हे जाती-आधारित अपमानाच्या श्रेणीत येत नाही. कोर्टाने याचिकाकर्त्यांचा हा युक्तिवाद फेटाळून लावला की आयआयटी संचालक लोकसेवक नाहीत.


याचिकाकर्त्यांचे वकील राजेश जोशी, हर्षित बोरानी यांनी युक्तिवाद केला की, जर एफआयआरमधील तथ्ये खरी मानली तर एससी-एसटी कायद्यानुसार कोणताही गुन्हा घडत नाही. 'नीच' हा शब्द कोणत्याही जातीचे नाव नाही, तर तो एखाद्याचे चारित्र्य सांगण्यासाठी वापरला जाणारा एक सामान्य शब्द आहे.

हे संपूर्ण प्रकरण २ सप्टेंबर २०२५ रोजीचे आहे. आयआयटी जोधपूरचे कार्यवाहक कुलसचिव अंकुर गुप्ता यांनी करवड पोलिस ठाण्यात एफआयआर (FIR) दाखल केली होती. आरोप होता की, सहयोगी प्राध्यापक डॉ. दीपक अरोरा संस्थेचे संचालक प्राध्यापक अविनाश अग्रवाल यांच्या कार्यालयात चर्चा करत होते. याच दरम्यान त्यांच्यात वाद झाला होता. प्राध्यापक दीपक अरोरा यांनी संचालकांवर हल्ला केला होता. तेथे उपस्थित कार्यालयीन सहायक विवेक गौतम आणि इतरांनी मध्यस्थी केली असता, प्राध्यापक दीपक यांनी विवेक गौतम यांच्यासोबत मारामारी केली. 'नीच' यांसारख्या शब्दांचा वापर करत शिवीगाळ केली. पोलिसांनी या प्रकरणात बीएनएसच्या कलमांसह एससी-एसटी कायद्याच्या कलमाखाली गुन्हा दाखल केला होता. याला डॉ. दीपक अरोरा यांच्या वतीने उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक,
आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903